# १८५७ चे स्वातंत्र्यसमर

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**१८५७ चे स्वातंत्र्यसमर : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मार्च, २०१२ - ६,००० प्रती
मे, २०१२ - ६,००० प्रती
सप्टेंबर, २०१२ - ६,००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर : ग्रंथाची गाथा

मुद्रणस्वातंत्र्याचा उद्‌घोष करणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ज्याच्यावर मुद्रणापूर्वीच बंदी घातली आणि तशी बंदी असताही ज्याचे मुद्रण आणि गुप्त प्रसारण श्रीमती कामा, लालात्मा हरदयाळ, हुतात्म भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र आदि रणझुंझारांनी केले, तो हा क्रांतिकारकांना स्फूर्ती देणारा ऐतिहासिक महत्त्वाचा महान ग्रंथ. याचे लेखक क्रांतिकारकांचे विचारप्रवर्तक नेते, स्वातंत्र्यवीर या नावाने गौरविलेले श्री. विनायक दामोदर सावरकर. या ग्रंथाचे लेखकाच्या हस्ताक्षरातील मूळ नाव असे : - **(अठराशे) सत्तावनचे स्वातंत्र्यसमर !** महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेने सन १९६५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या समग्र सावरकर वाङ्मयाच्या ८ व्या खंडामध्ये पृष्ठ २३ वर सावरकरांच्या हस्ताक्षराचा ठसा छापला असून त्यात हे नाव आहे. या पुस्तकाच्या लेखनाचा, त्यावर आलेल्या संकटांचा आणि ती संकटे निवारण कशी केली गेली याचा स्वातंत्र्यवीर सावरकरांनीच सांगितलेला इतिहास त्यांनी लिहिलेल्या 'शत्रूच्या शिबिरात' या पुस्तकात प्रकरण ५, पृष्ठे १८९ ते २१६ वर दिलेला आहे. अधिक उत्सुकांनी तो अवश्य वाचावा.

हा इतिहासग्रंथ लिहिण्याचा उद्देश काय, या प्रश्नाचे उत्तर देताना सावरकर सांगतात, ''सशस्त्र क्रांतीचा मार्ग पूर्णपणे अव्यवहार्य, अशक्य नि हास्यास्पद आहे, एवढेच नव्हे तर तो आत्मघातकही ठरेल असे सांगणाऱ्या लोकांना माझे ठाम उत्तर असे की इंग्रजांच्या हाताखाली असलेल्या ह्या आपल्या भारतीय सैनिकांच्या हाती जी शस्त्रें आहेत ती आपलीच आहेत. ते सैनिक अशिक्षित असले तरी त्यांच्यातही स्वातंत्र्याची इच्छा असलीच पाहिजे. ती त्यांच्या अंत:करणात असलेली स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करा. त्या सैन्यात चेतना उत्पन्न करा नि मग पहा परक्या इंग्रजांवरच तीच शस्त्रें कशी उलटतील ते.''

## हा पहा पडताळा

सावरकरांचा हा उद्देश चाळीस वर्षांत सफल झाला. दुसऱ्या महायुद्धकाळात भारतीय सैन्यात स्वातंत्र्याची ज्योत पुन्हा प्रज्वलित झाली. त्यांच्यात चेतना उत्पन्न झाली आणि ते सैन्य इंग्रजांवर उलटले, ही गोष्ट इंग्रज सत्ताधारी उमजले. म्हणून भारत स्वतंत्र झाला. आपले ध्येय पुष्कळ अंशी साध्य झाले, तीनचतुर्थांश भारत स्वतंत्र झाला. उर्वरित खंडित भारतातूनही इंग्रजी सत्ता गेली, याचा आनंद; पण मुस्लिम सत्ता निर्माण झाली याचे दु:ख, याचा राग ही भावना व्यक्त करण्यासाठी सावरकरांनी सन १९५२ मध्ये 'अभिनव भारत' या आपल्या सशस्त्र क्रांतिकारक संस्थेचा सांगता समारंभ, ध्येयपूर्ती समारंभ भव्य प्रमाणात पुणे येथे साजरा केला. त्या वेळच्या भाषणात सावरकर म्हणाले, ''ब्रिटन देश जरी वाचला तरी त्या दोन महायुद्धांच्या माऱ्याखाली ब्रिटनच्या साम्राज्यशक्तीचा आणि उन्मत्तपणाचा चक्काचूर झाला. हिंदुस्थानपुरते बोलायचे तर ब्रिटनची त्या महायुद्धाच्या शेवटी अशी स्थिती झाली होती की, (१) हिंदुस्थानातील भूदल, नौदल नि आकाशदल ह्या तीनही विभागांतील झाडून साऱ्या हिंदी सैन्याने ब्रिटिश विद्रोहाचा उठाव केलेला होता किंवा ते सैन्य तसा उठाव करण्याच्या मन:स्थितीत होते, (२) १८५७ मध्ये हिंदी सैन्य ब्रिटिश सत्तेवर जेव्हा उलटले तेव्हा ब्रिटन सहस्रावधि जातिवंत ब्रिटिशांचे नवे सैन्य धाडू शकले, पण आता विद्रोही बनलेल्या देशावर, स्वत:ची साम्राज्यसत्ता शस्त्रशक्तीने चालविण्यासाठी जुने वा नवे असे कोणचेही जातिवंत ब्रिटिश सैन्य इकडे धाडणे ब्रिटनला अशक्य झाले. त्यामुळे हिंदुस्थानला शरण जाण्यावाचून ब्रिटनला गत्यंतर उरले नाही.'' (समग्र सावरकर, खण्ड ८, पृष्ठ ४७७) म्हणजे सैनिक उठावामुळे भारत स्वतंत्र झाला. त्यावेळचे ब्रिटिश पंतप्रधान अॅटली यांनीही हे मान्य केले. सावरकरांचे प्रयत्न सफल झाले !

## ग्रंथाचा प्रभाव पहा !

'(अठराशे) सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' या नावाचे मूळ पुस्तक सावरकरांनी लंडनमधील अनेक कागदपत्रं अभ्यासून तेथेच सन १९०७/०८ मध्ये प्रथमत: मराठी भाषेत लिहिले. पण इंग्रजांनी त्यावर प्रसिद्धीपूर्वी बंदी घातल्याने ते येथे महाराष्ट्रात छापणे अशक्य झाले. परदेशातही ते मराठी पुस्तक त्यावेळी छापणे शक्य झाले नाही. पण पुस्तक तर छापणे आवश्यक. म्हणून त्याचे इंग्रजी भाषांतर करून ते युरोपात छापले. यासंबंधी विस्तृत वृत्त वर उल्लेखिलेल्या 'शत्रूच्या शिबिरात'मध्ये आहेच. पण तेथे ते इंग्रजीत छापलेले आहे. त्याचा मराठी अनुवाद हु. पंडित नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांनी सन १९४७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीत आहे. हे पुस्तक सन १९४७ मध्ये प्रसिद्ध झाले तेव्हा या ग्रंथाची मूळ मराठी आवृत्ती उपलब्ध नव्हती. म्हणून उपलब्ध झालेल्या इंग्रजी आवृत्तीवरून त्याचे मराठी भाषांतर करून घेऊन ती मराठी आवृत्ती प्रसिद्ध केली. त्यावेळी ह्या पुस्तकावरील बंदी उठली होती. असे असतानाही त्या आवृत्तीचे प्रकाशक पुढे सन १९४९ मध्ये गांधीवध अभियोगात फासावर दिले गेले. लेखकाला दोन जन्मठेपींची ५० वर्षांची शिक्षा, तसेच प्रकाशक श्रीमती कामा, लाला हरदयाळ, हुतात्मा भगवतसिंग, नेताजी सुभाषचंद्र आणि गोडसे, आपटे यांना काय काय कष्ट भोगावे लागले ते स्वतंत्र पुस्तक लिहूनच सांगावे लागेल. श्री. मो. शि. गोखले (मयुरेश) यांनीही इंग्रजी प्रतीची एक भूमिगत आवृत्ती सन १९४६ मध्ये प्रसिद्ध केली.

या ग्रंथाशी प्रकाशक म्हणून संबंध ठेवणेही एवढे धोकादायक होते. तरीही हा ग्रंथ पुढे ग. पां. परचुरे, के. भि. ढवळे, महाराष्ट्र हिंदुसभा, केशवराव कोठावळे, राजधानी ग्रंथागारचे श्री. भाटिया यांनी आणि वीर सावरकर प्रकाशनच्या वतीने मीही प्रसिद्ध केला आहे. याची दुसरी तामिळ आवृत्ती तसेच मल्याळी, गुजराथी, हिंदी आवृत्तीही प्रसिद्ध झाली आहे. १९४८ नंतरच्या ह्या प्रकाशकांना पूर्वीच्या प्रकाशकांइतके कष्ट मात्र सोसावे लागले नाहीत. एवढेच नव्हे तर यापैकी तीनचार प्रकाशक सुस्थितीत आहेत. आता श्री. फडके, मनोरमा प्रकाशन ही नवीन आवृत्ती काढीत आहेत. त्यांना धन्यवाद.

ह्यापूर्वी ह्या पुस्तकाच्या कोणकोणत्या भाषेत, कोणत्या नावाने, संपूर्ण वा संक्षिप्त स्वरूपात कशा आणि किती आवृत्त्या छापल्या गेल्या, हाही एक संशोधनाचाच विषय आहे. माझ्या निश्चित माहितीप्रमाणे दि इंडियन वॉर ऑफ इन्डिपेंडन्स ऑफ १८५७, लेखक : इंडियन नॅशनॅलिस्ट, या नावाने याची प्रथम आवृत्ती सन १९०९ मध्ये प्रसिद्ध झाली. या पुस्तकाच्या ९ आवृत्त्या पूर्ण, १ आवृत्ती संक्षिप्त, हिंदी भाषेत

३ आवृत्त्या संपूर्ण, २ संक्षिप्त, मराठीमध्ये श्री. पटवर्धनकृत भाषांतराच्या २ आवृत्त्या आणि सन १९४९ मध्ये मूळ मराठी प्रत सावरकरांचे हाती आल्यानंतर तिच्या ३ आवृत्त्या, पटवर्धनांच्या भाषांतराच्या मराठीत संक्षिप्त २ आवृत्त्या, यावाचून गुजराथी १, मल्याळी १, तामिळ २, तेलगू १ संक्षिप्त अशा एकूण २७ आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या मी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. यावाचून या ग्रंथाची उर्दू, फ्रेंच नि जर्मन भाषेतही आवृत्ती झाल्याचे उल्लेख वाचले आहेत पण त्या आवृत्त्या मी पाहिलेल्या नाहीत. आज माझ्या संग्रही इंग्रजी ६, हिंदी २, मराठी ४ आणि अन्य भाषांतील ३ संक्षिप्त अशा एकूण १५ आवृत्त्या सुरक्षित आहेत. मूळ मराठी आवृत्ती मुंबई येथील सावरकर राष्ट्रीय स्मारकामध्ये आहे.

ह्या पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठी एक टपालपत्र श्रीमती कामा यांनी इंग्रजीत छापलेले उपलब्ध आहे. त्यावर एका बाजूला झांशीची राणी असे नाव देऊन चुकून भोपाळच्या बेगमचे चित्र छापलेले आहे. त्या काळात इंग्लंडमध्येही एका हुक्का पिणाऱ्या शेटजीचे चित्र नानासाहेब पेशवे यांचे चित्र म्हणून छापले गेले होते. यात अज्ञान किती आणि 'न्या वेळ मारून' असा भाग किती, हा संशोधनाचा विषय आहे. त्या डाक पत्रात आवेदन देऊन पुस्तके मिळण्याचे दोन पत्ते दिलेले आहेत : (१) श्रीमती कामा, २५, युडी पॉथीयू, पॅरिस, फ्रान्स, (२) एफ. एच. पब्लिकेशन कमिटी, ७४९, थर्ड अॅव्हेन्यू, न्यूयॉर्क. मूल्य, कापडी बांधणी २ डॉलर्स, कागदी बांधणी दीड डॉलर. सन १९४७ मध्ये याच्या इंग्रजी आवृत्तीचे मूल्य रु. १५ होते. आताच्या आवृत्तीचे मूल्य रु. ३५० आहे.

स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच हा ग्रंथ इंग्रजी राज्याला घातक ठरेल अशी भीती इंग्रजी अधिकाऱ्यांना वाटत होती, असे मुंबई सरकारने भारत सरकारच्या गृहविभागाच्या सचिवांना पाठविलेल्या पत्रावरून स्पष्टपणे दिसते. या पत्रात विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेल्या आणि त्यांचे थोरले बंधू गणेश *(बाबाराव)* यांनी प्रसिद्ध केलेल्या मॅझिनीचे आत्मचरित्र आणि राजकारण यांचा उल्लेख करून पुढे लिहिले आहे की विनायक सावरकर सध्या लंडनमध्ये भारतीय बंडावर एक पुस्तक लिहीत असून ते पुस्तक तत्काळ दडपून टाकणे योग्य ठरेल. *(सोर्स मटेरियल फॉर ए हिस्टरी ऑफ दि फ्रीडम मुव्हमेंट, मुंबई सरकार, भाग २, पृष्ठ ३९९ आणि ४३९)*

**मूळ मराठी प्रत श्रीकृष्णाप्रमाणे गुप्त !**

मुंबई शासनाच्या ह्या सूचनेनुसार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ह्या पुस्तकाची एक मराठी प्रत कशी नष्ट केली हे अजूनही कळलेले नाही. पण सावरकर सतत सावध असल्याने त्यांनी या पुस्तकाची एक कच्ची मराठी प्रत त्यांचे त्या वेळचे गोमंतकीय सहकारी डॉ. कुटिन्हो यांच्यापाशी देऊन ठेवलेली होती. डॉ. कुटिन्हो हे गोव्याचे ख्रिश्चन म्हणजे पोर्तुगालचे नागरिक. त्यामुळे त्यांच्यावर ब्रिटिश गुप्तचरांची कडक दृष्टी नव्हती. डॉ. कुटिन्हो हेही खरे देशभक्त. ते पुढे अमेरिकेत गेले. त्यांनी ही मूळ मराठी प्रत ४० वर्षे गुप्तपणे जपून ठेवली. पुढे हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर त्यांनी ही प्रत नीट चौकशी करून सावरकरांकडे पोचती केली. ४० वर्षांनंतर मे १९४९ मध्ये ही मूळ प्रत मूळ ग्रंथलेखकाकडे आली. पुढे ही मूळ प्रत स्वत: सावरकरांनी नीट पाहिली, त्यांच्या सांगण्यानुसार मी ती नीट लावली. एवढेच नव्हे तर त्यामध्ये जी दोन प्रकरणे नव्हती तीही मी प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी आणि मराठी प्रतींच्या आधारे नवीन भाषांतर करून लिहिली. श्री. ना. मो. दातार यांनीही या कामात सहाय्य केले. पुढे हा मूळ मराठी ग्रंथ महाराष्ट्र हिंदुसभा प्रकाशित समग्र सावरकर वाङ्मयाच्या आठव्या खंडात सन १९६५ मध्ये प्रथम समाविष्ट करण्यात आला. याची दुसरी आवृत्ती मॅजेस्टिक प्रकाशनने आणि तिसरी आवृत्ती मी वीर सावरकर प्रकाशनाच्या नावाने सन १९८२ मध्ये प्रसिद्ध केली. आता ही त्याची चौथी आवृत्ती मनोरमा प्रकाशन प्रसिद्ध करीत आहे.

स्वातंत्र्यसमर ग्रंथाचा इतिहासही असा अद्‌भुत आहे, तसेच ह्या ग्रंथाचे लेखक वीर सावरकर यांचेही चरित्र आणि लेखन अद्‌भुतच आहे. त्यांनी स्वत:च लिहिलेल्या उ:शाप ह्या नाटकाच्या प्रारंभीच्या नांदीच्या पदात म्हटले आहे की आजवरचे ज्याचे अद्‌भुत चरित्र अन्य कवींचा नाट्यविषय व्हावे तोच विनायक आज दुसऱ्याच्या जीवनावर नाटक लिहीत आहे. यानंतर त्या नाटकातील नटी म्हणते, ''विनायकाचे नाव ऐकताच हा कोणीतरी अधिकारी नाटक बंद करण्याकरिता इकडे येतो की काय असे वाटते.... विनायकच्या लेखणीची देवकीच्या देवबंध कुसव्यासारखी करुणास्पद स्थिती झालेली आहे.'' सावरकरांनी स्वत: आपल्या लेखणीला देवकीच्या कुसव्याची उपमा दिली आहे. ही उपमाही किती सार्थ झाली आहे पहा ! देवकीचा आठवा पुत्र श्रीकृष्ण जसा अनेकांचा स्फूर्तिदाता, मुक्तिदाता झाला त्याप्रमाणे

सावरकर लिखित 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ ब्रिटिश साम्राज्याच्या पकडीतून निसटून देशात, परदेशांत वाढून भारताला स्वतंत्र करण्यात यशस्वी झाला. त्याने आजवर अनेकांना स्फूर्ती दिली. यापुढेही देईल. याच्या वाचनाने स्फूर्ति घेतलेले पराक्रमी युवक भावी काळात हा हिंदुस्थान प्रबल, समृद्ध आणि समाधानी करण्यासाठी आपापले कर्तव्य पार पाडतील ही प्रबल आशा ! त्यासाठी हे प्रकाशन. हा प्रयत्न.

दीपावली युगाब्द ५०९१
दिनांक ३०-१०-१९८९

**आचार्य बाळाराव सावरकर**
संचालक: वीर सावरकर प्रकाशन
सावरकर सदन, मुंबई २८



**भारतीय राष्ट्रस्वातंत्र्य-संघटनेचे जनक व**
**'१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचे लेखक**
**स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर**




१८५७ च्या रणसंग्रामात तळपणारी
रणलक्ष्मी लक्ष्मीराणी



१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे सेनापति
वीर तात्या टोपे

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हस्ताक्षरात




अठराशेसत्तावनचे

स्वातंत्र्यसमर

*भाग : पहिला*

ज्वालामुखी